बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस नं. २०० | नोटीस | दि :१३/०९/२०२२

## अनुसूचित जाती प्रवर्गातील स्कॉलरशिपधारक विद्यार्थ्यांनी केंद्र शासनामार्फत जमा झालेली महाविद्यालयाची शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयाचे खात्यामध्ये जमा करणेबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये **अनुसूचित जाती (SC) च्या** ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून **Government of India Post-Matric Scholarship** या योजनेसाठी ऑलनाईन अर्ज भरलेला होता अशा सर्व विद्यार्थ्यांचा व्दितीय हप्ता (**Second Installment**) ६०% रक्कम केंद्रशासनामार्फत **DBT** व्दारा थेट विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे / येणार आहे.

तरी आपले महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या वरील योजनेकरिता शै. वर्ष २०२१-२२ मध्ये महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी सदर रक्कम केंद्रशासनाने ज्या प्रयोजनार्थ विद्यार्थ्याच्या खात्यामध्ये जमा केलेली आहे अशी रक्कम विद्यार्थ्यांनी रक्कम जमा झाल्यापासून ७ दिवसांचे आत महाविद्यालयास जमा करावी असे केंद्र शासनाचे आदेश आहेत याची नोंद घ्यावी.

तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही त्यांचे खात्यामध्ये जमा झालेली रक्कम महाविद्यालयाला जमा केलेली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांनी सदर रक्कम ऑनलाईन पेमेंटव्दारे अथवा डी.डी.व्दारे महाविद्यालयाचे खात्यामध्ये जमा करावी. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पेमेंटव्दारे रक्कम जमा करण्याबाबत काही अडचीी येत असल्यास लेखा विभागाशी accounts.fees@vit.edu मेंलव्दारा अथवा विद्यार्थी विभागाशी प्रत्यक्ष भेटून त्वरीत संपर्क साधावा. शासनामार्फत जमा झालेली शिष्यवृत्तीची रक्कम कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना वापरता येणार नाही याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी, सदर रक्कमेचा गैरवापर झाल्याचे महाविद्यालयाचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करणेचे अधिकार महाविद्यालयाला राहतील याची नोंद घ्यावी.

B. R. A. C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७ VISHWAKARMA INSTITUTE OF TECHNOLOGY

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाचे संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करणेसाठी.